# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९

ई-मेल- *jtdirrom@gmail.com* *website – www.jdteromumbai.com*

परिपत्रक

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/ 1897

तात्काळ

दिनांक : 14 JUN 2018

प्रति,
प्राचार्य,
शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयातील
**सर्व सुविधा केंद्र आणि प्रवेश निश्चिती केंद्र**

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रियेकरिता कार्यरत सुविधा केंद्र व प्रवेश निश्चिती केंद्रांवर राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आणि डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना यांची माहिती प्रसिध्द करण्याबाबत. . . . . . . . . .

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०१८/७१०, दि. ०८/०५/२०१८

मुंबई विभागांतर्गतच्या शासकीय (शासकीय अभिमत विद्यापीठांसह), अशासकीय अनुदानीत व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांपैकी ज्या संस्थांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्राच्या प्रवेश प्रक्रियेकरिता सुविधा केंद्र (Facility Centre) आणि प्रवेश निश्चिती केंद्र (Admission Reporting Center) निश्चित करण्यांत आली आहेत. अशा संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना लागू आहे अशा उमेदवारांना व त्यांच्या पाल्यांना सदर योजनेची माहिती होण्याच्या अनुषंगाने भित्तीफलकाच्या स्वरुपात आपल्या केंद्रांवर दर्शनीभागी माहिती लावण्यांत यावी. तसेच सदर योजनेतील नियम, निकष व अटींबाबत प्रवेच्छुक उमेदवारांना तथा त्यांच्या पाल्यांना सविस्तर माहिती देण्यात यावी. या सूचनेचे सर्व संस्थांनी काटेकोर पालन करावे.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
यांचेकरिता

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे

क्रमांक: २अ/एडीएम/२०१८/ ७७०
दिनांक : - 8 MAY 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रियेकरिता कार्यरत सुविधा केंद्र व प्रवेश निश्चिती केंद्रांवर राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आणि डॉ.पजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना यांची माहिती प्रसिध्द करण्याबाबत.....

संदर्भ : शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४,दिनांक ७.१०.२०१७

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष२०१८-१९ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्या आहेत. या प्रवेश प्रक्रियेसाठी सर्व विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना सुविधा केंद्र (Facilitation Center) आणि प्रवेश निश्चिती केंद्र (Admission Reporting Center) निश्चित करण्यात येत आहेत.

शासनाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आणि डॉ.पजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना लागू केलेली आहे. सदर योजनेची संपूर्ण माहिती भित्तीफलकाच्या स्वरूपात सर्व विद्यार्थी आणि पालकांना समजणे आवश्यक आहे. त्यासाठी आपल्या विभागातील सर्व सुविधा केंद्र आणि प्रवेश निश्चिती केंद्रावर या योजनांची माहिती विद्यार्थी आणि पालकांच्या ठळकपणे निदर्शनास येईल् अशा पध्दतीने प्रदर्शित करण्याबाबत सर्व संबंधित सुविधा केंद्र व अर्ज निश्चिती केंद्र म्हणून नियुक्त केलेल्या संस्थांना सूचना देण्यात याव्यात. सदर सूचनेची अंमजबजावणी काटेकोरपणे करण्याबाबतही संस्थांना कळविण्यात यावे.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीकरिता सविनय सादर
१.मा.अपर मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन ,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई
२.मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई
३. सर्व सुविधा केंद्र व प्रवेश निश्चिती केंद्रांना माहितीसाठी

Scanned with CamScanner